**प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचा प्रस्तावित महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पागोटे (कि.मी.०.१००) ते चौक (२९.३१९) पर्यत राष्ट्रीय महामार्ग -३४८ ब (ग्रीनफिल्ड) चा प्रस्तावित सहा पदरी प्रवेश नियंत्रित विभाग (एकण लांबी-२९.१२९ कि.मी.) विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचा प्रस्तावित महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पागोटे (कि.मी.०.१००) ते चौक (२९.३१९) पर्यत राष्ट्रीय महामार्ग-३४८ ब (ग्रीनफिल्ड) चा प्रस्तावित सहा पदरी प्रवेश नियंत्रित विभाग (एकण लांबी-२९.१२९ कि.मी.) विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल – ४१०२०६, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई तथा आयोजक,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, जिल्हा–रायगड तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती,प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली. त्यांनी सांगितले की पुढील प्रस्तावना हे सहकारी श्री योगेश गोरे, क्षेत्र अधिकारी करतील.

श्री योगेश गोरे, क्षेत्र अधिकारी. प्रतिनिधी, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रतिनिधी, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे

परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

प्रतिनिधी, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचा प्रस्तावित महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पागोटे (कि.मी.०.१००) ते चौक (२९.३१९) पर्यत राष्ट्रीय महामार्ग -३४८ ब (ग्रीनफिल्ड) चा प्रस्तावित सहा पदरी प्रवेश नियंत्रित विभाग (एकूण लांबी-२९.१२९ कि.मी.) विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि त्यातील सुधारित तरतुदींनुसार **संवर्ग ए** अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज

दिनांक १३.०१.२०२५ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १५.०५.२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक १३.१०.२०२५ सादर करण्यात आलेला होता.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक एमपीसीबी/जेडी(डब्ल्यूपीसी)/ईएनवी-पीएच/बी-२५१००८-एफटीएस-००७७, दिनांक ०८.१०.२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांनी पत्र दिनांक २९.१०.२०२५ रोजी मा.

जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग, जिल्हा-रायगड यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग, जिल्हा-रायगड यांनी त्यांच्या पत्र दिनांक ११.१२.२०२५ च्या पत्रानुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुकवार, दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल – ४१०२०६, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आलेली होती. अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित करण्यात आलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-१०/ २०२६, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२६०२०२-एफटीएस-००८४, दिनांक ०२.०२.२०२६ अन्वये भारत सरकारच्या

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१.१२.२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

1) जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

2) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी — प्रादेशिक अधिकारी - रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई - **सदस्य**

3) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई यांनी . तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

| | |
|---|---|
| 1) | प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर — ४४०००१ |

| | |
|---|---|
| 2) | मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग |
| 3) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,रायगड,अलिबाग |
| 4) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,रायगड,अलिबाग |
| 5) | प्रांताधिकारी,प्रांत कार्यालय,तालुका-पनवेल,जिल्हा-रायगड |
| 6) | प्रांताधिकारी,प्रांत कार्यालय,तालुका-उरण,जिल्हा-रायगड |
| 7) | प्रांताधिकारी,प्रांत कार्यालय,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड |
| 8) | तहसीलदार, तहसील कार्यालय,तालुका-पनवेल,जिल्हा-रायगड |
| 9) | तहसीलदार, तहसील कार्यालय,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड |
| 10) | गटविकास अधिकारी,पंचायत समिती,तालुका-पनवेल,जिल्हा-रायगड |
| 11) | पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ |
| 12) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईंट, 3रा मजला, सायन-माटुंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन पूर्व, मुंबई – ४०००३२ |
| 13) | प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 6वा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई. |
| 14) | उप प्रादेशिक कार्यालय-रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 6वा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई - |
| 15) | ग्रामपंचायत कार्यालये- ग्रुप ग्रामपंचायत जुई, कळंबूसरे, चिरनेर, कर्नाळा, आपटा, चाचणे, जांभिवली, वाशिवली, इंसाबे, टेंबरी, तुपगाव, चौक |
| 16) | संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>-कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध करण्यात आलेला आहे. |

मात्र रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्याने व आचारसंहिता लागू असल्याने मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांनी दिनांक ३०.०१.२०२६ ची सदरहु जनसुनावणी बैठक रद्द केली.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या २३.०१.२०२५ पत्रानुसार सदरहू प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जनसुनावणी ही आज सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल – ४१०२०६, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यास परवानगी दिली. संबंधित आदेशानुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांनी शुध्दीपत्र (Corrigendum) व्दारे स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत शनिवार दिनांक २४.०१.२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती.

प्रतिनिधी, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

प्रतिनिधी, आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या आदेशानुसार प्रकल्पाचे पर्यावऱण सल्लागार यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाव्दारे प्रकल्पाविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचा प्रस्तावित महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील पागोटे (कि.मी.०.१००) ते चौक (२९.३१९) पर्यत राष्ट्रीय महामार्ग -३४८ ब (ग्रीनफिल्ड) चा प्रस्तावित सहा पदरी प्रवेश नियंत्रित विभाग

(एकण लांबी- २९.१२९ कि.मी.) विकास करण्याचे नियोजित केलेले आहे. सदरहू रस्त्यामुळे उरण, पनवेल आणि खालापूर यांसारख्या महत्वाच्या शहरांशी संपकर्ता वाढीस लागेल. त्याचप्रमाणे प्रस्तावित ग्रीनफिल्ड मार्ग NH-४८ वरुन येणा-या वागतुकीसाठी जेएनपीटी बंदरापर्यंत थेट सुविधा प्रदान करेल. प्रस्तावित प्रकल्प पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राशी तसेच आसपासच्या गावांसाठी सुधारित संपर्कता वाढवेल. सदरहू प्रकल्पामुळे नवीन रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. त्याचप्रमाणे अपघातांची जोखीम कमी करुन रस्ता सुरक्षितता वाढवेल.

सदरहू प्रकल्पास ₹ ३,६५३.०९ कोटी खर्च अपेक्षित आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात घेण्यात येणा-या पर्यावरण व्यवस्थापनाची संपुर्ण माहिती सादरीकरणात दर्शविली. बांधकाम टप्प्यात मातीचा त्रास स्थानिक लोकांना न होण्यासाठी नियमितपणे पाणी फवारणी करणार असल्याचे सांगितले. तसेच जंगल व संवेदनशील क्षेत्राजवळ रात्रीच्या वेळेस बांधकामाचे काम टाळले जाईल.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा स्थानिक पनवेल तालुका, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हितासाठीचा आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रणासाठी योजण्यात

येणा-या पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिलेली आहे. तरी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक प्रश्नच उपस्थित करण्याची सूचना करण्यात येत आहे. आपण केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम नांव व राहण्याचे ठिकाण/गाव सांगण्यात यावे. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखीस्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदन सादर करावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

1) **श्री विजय रामदास म्हात्रे, राहणार-चिरनेर रोड, तालुका-पनवेल,जिल्हा-रायगडः-**

प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण येथे दर्शविण्यात आलेले आहे. विकास चांगला आहे. पण ज्या शेतक-याच्या शेतातून प्रस्तावित रस्ता जाणार आहे, त्या शेतक-यांसाठी एकही मुद्दा सादरीकरणात उल्लेखित नाही. त्यांना विश्वासात घेण्यातच आलेले नाही. आमची वडिलोपार्जित जमिन आहे.

आमच्या पुर्वजांनी लावलेली झाडे आहेत. ती आता विकासासाठी तोडली जाणार आहेत. आता पनवेल-नवी मुंबईत नविन आंतरराष्ट्रीय विमानतळ झालेला आहे. तेथील प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. मात्र सर्व भाऊबंध हे विखुरले गेलेले आहेत. तसे आमचे होईल काय असे वाटायला लागलेले आहे. म्हणजे आमच्या वडिलोपार्जित जमिनी, आमचा विचार न करता प्रस्तावित रस्त्याचे नियोजन करण्यात आले.आम्ही ग्रामपंचायतीस वारंवार विचारणा केली असता ग्रामपंचायत कार्यालय सांगते की आम्हांला काहीही माहिती नाही, फक्त नोटीस दिली जाते.

श्री विजय म्हात्रे यांनी आक्षेप नोंदविला की आम्ही पिढ्यानपिढ्या व्यवसायाने शेतकरी आहोत. आमचा पोटाचा घास काढणार आहात. आमचा पुर्ण उदरनिर्वाह हा शेतीवरच आहे. मात्र सादरीकरणात शेतक-याबाबत एकही मुद्दा दर्शविण्यात आलेला नाही. नविन झाडे कदाचित परत लावण्यात येतील. मात्र शेतक-याचा घास जाणार आहे, त्यास सादरीकरणात उत्तरच नाही. यासाठी उरण मेट्रो कार्यालयात वारंवार गेलो. त्यांना वारंवार बैठक घेण्याची सूचना केली. तरी आमची विनंती शासनास कळवावी.

आज जे मालक - शेतकरी, भूमी पुत्र, स्थानिक लोक आहेत, ते या प्रकल्पामुळे प्रकल्पबाधित होणार आहेत तसेच जे प्रकल्प बाधित होणार आहेत, त्या प्रकल्पबाधितांना रोजगार कोणाला देणार याबाबत तरतुद नाही. माझी स्वतःची दिड एकर जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे. तर

कुठल्या प्रकारचा रोजगार देणार याबाबत सादरीकरणात उल्लेख नाही. म्हणजे प्रकल्पबाधितास संवर्ग-४ मध्ये वा संवर्ग-३ मध्ये रोजगाराची संधि देणार का याबाबत स्पष्टता नाही.

आमची वडिलोपार्जित जमिन म्हणजे आजोबांची जमिन वडिलांना, वडिलांची मला जमिन मिळाली. शेताने असंख्य पिढ्या पोचल्या. मात्र प्रकल्पात प्रकल्पबाधितास एका पिढीलाच रोजगार देणार आहेत. तर आमच्या पुढल्या पिढ्यांबाबत काहीही नियोजन नाही. तसेच जर प्रकल्पबाधितास रोजगार देण्यात आला, तर त्याच्यानंतर त्याच्या वारसदारासंसुध्दा त्याच्या/तिच्या शैक्षणिक अहर्तेनुसार रोजगाराची संधि देण्यात यावी. तरी प्रकल्प बाधित शेतक-यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प राबविण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर देताना सांगितले की श्री विजय म्हात्रे यांनी योग्य मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मात्र ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहण हे भूसंपादन कायद्यांतर्गत होणार आहे. भूसंपादन अधिग्रहणाच्या दोन पध्दती आहेत. एक भूसंपादन कायदा व दुसरा पुनर्वसन कायदा. तर भूसंपादन कायद्यात एखाद्या प्रकल्पाचा लाभ ठराविक क्षेत्रासाठी आहे उदाहरण – धरणासाठी जमिन अधिग्रहित करावी लागल्यास लाभक्षेत्रातील शेतक-यांच्या जमिनीवर स्लॅब बसवून त्यांच्या शेतजमिनीतील काही भाग

घेऊन प्रकल्पबाधित शेतक-यांना लाभक्षेत्रात भूखंड प्रदान करण्यात येतो. ते पुनर्वसन कायद्यांतर्गत येते.

आता अस्तित्वात आलेल्या भूसंपादन कायद्यात पुनर्वसन नसते, तर योग्य मोबदला मोठ्या प्रमाणात प्रदान करणे हे अंतर्भूत असते. कायद्यातील निर्देशित कार्यपध्दतीनुसार मोबदला प्रदान करण्यात येतो. येथे भूसंपादन अधिकारी उपस्थित आहेत. या बैठकीनंतर ते उपलब्ध आहेत, त्यांच्याशी प्रस्तावित बैठकीविषयी प्राथमिक चर्चा संबंधित प्रकल्पग्रस्त करु शकतात. सदरहू बैठक पर्यावरणविषयक असुन प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरणविषयक सल्लागार प्रकल्प विकसित करताना करणा-या प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची माहिती देत होते.

श्री विजय म्हात्रे यांनी उपस्थित केलेले मुद्दे योग्य आहेत. शेतीवर पिढ्यानपिढ्या जगत असतात. मात्र हा विषय भूसंपादनाचा आहे.

येथे श्री विजय म्हात्रे यांनी परत आक्षेप नोंदविला की आम्ही प्रशासनास वारंवार विनंती केलेली आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणा-या शेतक-यांना मोबदला कसा देणार, कशाप्रकारचा रोजगार देण्यात येणार यासाठी व्यासपीठ मिळाल्याने आक्षेप नोंदविलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी भूसंपादन अधिकारी या बैठकीनंतर प्रस्तावित बैठकीची प्राथमिक चर्चा करतील.

2) **श्री कृष्णा आनंद म्हात्रे, राहणार-चिरनेर,तालुका-पनवेल,जिल्हा-रायगडः-** मी चिरनेर गावातील शेतकरी आहे. प्रस्तावित रस्ता हा ज्या शेतजमिन जातो, त्याचा मोबदला कोणाला देणार आहात, शेतात राबणा-या शेतक-याला देणार का वारसाहक्काने शेतकरी असलेल्यांना देणार याबाबत खुलासा करण्यात यावा. आम्ही उपाशी राहून काबाडकष्ट करुन शेती सांभाळली. त्याचा मोबदला कोणार देणार आहात?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की भूसंपादन व मोबदला या विषयावर येथे उत्तर देण्यात येणार नाही. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. यानंतर भूसंपादन अधिका-यांबरोबर प्रस्तावित बैठकीची प्राथमिक चर्चा करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना फक्त प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयकच सूचना, विचार,प्रश्न किंवा हरकती उपस्थित करण्याचे आवाहन केले. रस्ता बांधताना धूळ उडेल म्हणून पाणी शिंपडणे, सादरीकरणात दर्शविण्यात आलेल्या विविध पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी माहिती,स्पष्टीकरण या मुद्द्यांवर विचारणा करण्यात यावी.

3) **श्री संतोष ठाकूर, राहणार-चिरनेर, तालुका-पनवेल,जिल्हा-रायगडः-**

चिरनेर गांव हे हुतात्म्यांचे गांव आहे. बैठकीत सूचना करण्यात आलेली आहे की फक्त प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

प्रस्तावित प्रकल्पासाठी झाडांची कत्तल होणार आहे. त्या झाडांवर नंबरसुध्दा लावलेले आहेत. तर झाडांवर लावलेले नंबर्स हे वनविभागातर्फे लावण्यात आलेले आहेत काय किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत लावण्यात आलेले आहेत?

तसेच कत्तल करण्यात येणा-या झाडांचे माहिती देण्यात आलेली आहे. मात्र ₹ ३,६५८ कोटीचे काम कोणत्या कंत्राटदारास देण्यात आले याबाबत स्पष्टीकरण नाही. तसेच २९.० कि.मी. वर जी झाडे लावणार आहात, तर त्या त्या गावातील पर्यावरणाचे काम हे त्या त्या गावातील प्रकल्पबाधित स्थानिक शेतक-यांना मिळेल काय?

तसेच हा पर्यावरणाचा मुद्दा आहे. आमच्या विहिरी बाधित झालेल्या आहेत. तसेच माझ्या नातेवाईकांचे ८१ कलमे (लहान झाडे) ही बाधित झालेली आहेत. आमची शेती दुबार पीक देणारी आहे. चवळी, वाल, डबल बी अशी पीके घेतली जातात. तर पर्यावरणाचे काम/ठेका येथील त्या त्या गावातील बाधित शेतक-यांना मिळेल काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना माहिती दिली की प्रस्तावित प्रकल्पातील रस्ता पागोटे ते चौक येथील रुंदीकरणाचे कंत्राट हे पार्ट आणि

पिसेसमध्ये (Part & Pieces) होत नाही. प्रकल्पात माती भरण्याचे, झाडांचे, पूल बांधण्याचे काम हे वेगवेगळे करता येत नाही. तर संपूर्ण एकच कंत्राटी कामात या विविध बाबी अंतर्भूत असतात. त्यामुळे पारित निर्देशांनुसार ज्या संस्थेस (कंपनीस) हे कंत्राट प्राप्त होईल, त्यालाच तेही काम करावे लागेल.

त्यावेळी **श्री संतोष ठाकूर, राहणार-चिरणे, तालुका-पनवेल,जिल्हा-रायगड यांनी** आक्षेप नोंदविला की मुंबई-गोवा महामार्गातील कामे हे त्याच त्याच सरपंचाच्या लोकांना, कंत्राटदारांनाच कशी मिळतात. तेथील स्थानिक बाधित शेतक-यांना झाडे लावण्याचे काम का देत नाहित? ते काम स्थानिक बाधित शेतक-यांनाच मिळायला पाहिजे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मुद्द्यांची नोंद घेण्यात आल्याचे घेतल्याचे सांगितले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

4) **श्री अतुल दत्तात्रय मालकर, राहणार-तलवडी गाव, चौक परिसर, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

प्रकल्प चांगला आहे, विकासाला आमचा विरोध नाही. प्रस्तावित प्रकल्प हा आमच्या चौक-खालापूर परिसरात म्हणजे आमच्या पाताळगंगा नदीवर होत आहे. पाताळगंगा नदीत चांगले मासे मिळतात, नदीकिनारी

परिसरात झाडेझुडपे आहेत. प्रस्तावित प्रकल्पामुळे उत्पन्न होणा-या सांडपाण्यामुळे, पाताळगंगा नदीपरिसर प्रदूषित होईल काय? त्यावरिल प्रस्तावित उपाययोजनांचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पामुळे पाताळगंगा नदी व तेथील झरे हे बाधित होणार नाहीत यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण अनुमती (ईसी) प्रदान करतानाच देण्यात येणार आहेत. त्यामुळे येथील नैसर्गिक अधिवासावर कोणताही परिणाम होणार नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, हरकती नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कायदेशीर प्रक्रिया पार पडण्यासाठी उपस्थितांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपल्याचे जाहिर केले. त्यांनी सूचना केली ज्यांचे भूसंपादनाबाबत मुद्दे आहेत, त्यांनी थांबावे व इतरांनी जाण्यास हरकत नाही.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाली.

सोबत  एकही **हरकती/आक्षेप** आलेले नाहीत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड.

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,  जिल्हा – रायगड